# भारतातील दबावगट आणि राजकीय पक्ष

**प्रा. अनिल रा. कडू**

सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग), स्व. पंचफुलाबाई पावडे, महिला महाविद्यालय वरूड, जि. अमरावती

प्रगल्भ भारताच्या लोकशाहीमध्ये राजकीय प्रक्रियेत अनेक घटक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या कार्य करीत असतात. राजकीय पक्षाप्रमाणेच दबावगट अथवा हितसंबंधी गट हे भारतीय राजकारणात प्रभाव पाडताना दिसून येतात. १० व्या शतकाच्या प्रारंभी राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी राजकीय व्यवस्थेत प्रभाव पाडणाऱ्या दबावगट या संकल्पनेची दखल घेतली. सन १९०८ मध्ये 'The process of Government' या ग्रंथाद्वारे बेरले यांनी संकल्पनेसंबंधी विश्लेषण मांडले. समाज हा वेगवेगळ्या हितसंबंधी गटांनी बनलेला आहे. समाज हित संबंध असणारे लोक जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांचा एक गट निर्माण होतो. हितसंबंध हे धार्मिक, सामाजिक, वंशीय, जातीय, प्रादेशिक, आर्थिक असे वेगवेगळे असतात. भारतामध्ये वेगवेगळे व्यवसाय वर आधारित आर्थिक लाभातून निर्माण होणारे कारभार, व्यापारी, उद्योगपती, सरकारी कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक, शेतकरी विविध जातीवर आधारित संघटना महिला संघटना, युवक संघटना असे विविध दबावगट भारताच्या राजकारणाच्या प्रक्रियत दबावगट आपआपला दबदबा निर्माण करतांना दिसून येतात. आपल्या हितसंबंधाच्या पूर्तीसाठी शासनावर व प्रशासनावर दबाव आणून त्यांना निर्णय घ्यायला आणि बदलायला लावणाऱ्या संघटित समूहांना दबावगट असे म्हणतात. भारताच्या राजकारणामध्ये दबाव गटाचे रूपांतर राजकीय प्रक्रियेत झालेले दिसून येते. सुरूवातीला दबाव गटाबद्दल अत्यंत तिरस्काराची भावना सर्वत्र होती. लोकशाही प्रक्रियामध्ये ते निःक्षेप आणतात किंवा सार्वजनिक हितसंबंधाची किंमत देऊन स्वतःचे स्वार्थी हितसंबंध सू-सूत्र मार्गांनी साधण्याचा प्रयत्न करतात. अशी त्याच्या विषयी जनभावना होती. लोकशाहीच्या दृष्टीने विविध हितसंबंधी आणि राज्यकर्ते यांना जोडणाऱ्या दुव्यांची महत्त्वपूर्ण भूमिका ते पार पाडतात. भारतातील सर्व मोठा राजकीय पक्ष म्हणून उदयास आला तो राष्ट्रीय काँग्रेसपक्ष सुरूवातीला एक दबावगट म्हणून १८८५ साली राष्ट्र उभारणीसाठी सामोरे आला. शासनावर नियंत्रण प्रस्थापित करण्याऐवजी केवळ शासनावर प्रभाव टाकणे व आपल्या मागण्या मान्य करून घेणे तेवढाच त्या संघटनेचा हेतू होता. परंतु त्याचे रूपांतर १९८० साली काँग्रेस ही एक चळवळ म्हणून उभारल्या गेली. १९४७ नंतरही यापैकी बरेचगट राजकीय प्रक्रियेत आपले स्थान निर्माण करून पक्षाचा घटक म्हणून व मजबूत पक्ष म्हणून अस्तित्वात आले.भारतीय समाजात निरनिराळ्या वर्गांना व विभागांना आपल्या हितसंबंधाच्या रक्षणाबाबत प्रयत्नशील राहण्याचे भान आले. त्यामधून जागरूकता निर्माण झाली. प्रत्येक देशाच्या राजकीय व शासकीय व्यवस्थेवर दबावगट प्रभाव कमी अधिक प्रमाणात पडत असेलला दिसतो. समाजात विविध प्रकारचे हितसंबंधीगट समूह असतात. जेव्हा विशिष्ट हितसंबंधीचे लोक एकत्रित येऊन विशिष्ट क्रिया-प्रक्रिया करीत असतात आणि आपले हितसंबंध सुरक्षित ठेवतात तेव्हा त्यास हितसंबंधी गट किंवा समूह असे संबोधण्यात येते. दबावगट म्हणजे आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी शासन संस्थेवर प्रभाव पाडणारा गट होय.

**दबावगटाची व्याख्या -**

१) झिगलर - "दबावगट म्हणजे असा हितसंबंधी गट की जो आपल्या सदस्यांना औपचारिक स्वरूपाची शासकीय पदे मिळवून न देता शासनावर प्रभाव पाडण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या खासगी संघटना म्हणजे दबावगट होय."

२) व्ही.बी.के - "शासनाच्या धोरणावर प्रभाव पाडण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या खाजगी संघटना म्हणजे दबावगट होय."

३) डेव्हिड दमन - "दबावगट म्हणजे समाजातील अन्य गटाकडून काही अपेक्षापूर्ण केल्या जाण्यात असा दृष्टिकोन असण्यास समाजहितसंबंधी लोकांचा समूह होय आणि असा समूह जेव्हा शासनावर प्रभाव पाडतो तेव्हा तो दबावगट म्हणून ओळखला जातो."

४) के - "यांच्या मते शासनाच्या सार्वजनिक ध्येयधोरणावर आणि निर्णयावर प्रभाव टाकणाऱ्या खाजगी स्वरूपाच्या संघटना म्हणजे दबावगट होय."

**भारतातील दबावगटाचे प्रकार** १)विशेष संघटित दबावगट आणि दहशतवादी मार्गाचा अवलंब करणारे दबावगट.२)आर्थिक

हितसंबंध बाळगणारे दबावगट आणि सामाजिक, सांस्कृतिक उद्देश बाळगणारे दबावगट.३)घटनात्मक मार्गावर विश्वास ठेवणार दबावगट.

**१)कामगार संघ** -भारतात औद्योगिकीकरणाचा वेग वाढल्यानंतर औपचारिक कामगाराच्या संख्येत वाढ होवू लागली. त्याच बरोबर त्याच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी कामगार व संघटना स्थापन होऊ लागल. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातच कामगार संघटना अस्तित्वात आल्या होत्या. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांच्या संख्येत वाढ  झाली असल्याचे पहावयास मिळाले.

**२)औद्योगिक समूह** -भारतीय समाजात उद्योगपती भांडवलदार आणि व्यापारी यांचे हितसंबंध गट आढळून येतात. भारतात समाजवादी समातर रचनेचे ध्येय स्वीकारले असले तरी प्रत्यक्षात या वर्गाचे समाज व्यवस्थेवर काही प्रमाणात वर्चस्व असलेले दिसते. शासनावर भांडवलदार व व्यापारी वर्गाचा विशेष प्रभाव असलेला दिसतो. भांडवलदार आणि व्यापारी वर्गाचे काही संघ स्थापन करतात.

**३)शेतकरी संघटना** -भारतीय शेतकरी वर्गाची संख्या फार मोठी आहे. तरी हा वर्ग आतापर्यंत बराचसा असंघटित होता. येथील काही राजकीय पक्षांनी आपल्या शेतकरी संघटना स्थापन केल्या होत्या पण त्यांचा प्रभाव फारच मर्यादित होता.

**४)विद्यार्थी संघटना** -स्वातंत्र्योत्तर काळात विद्यार्थी संघटनांच्या संख्येत बरीचवाढ झाली आहे. या संघटना सक्रिय असल्याने त्यानी आपला मोठा दबदबा निर्माण केला आहे. त्यांनी अनेकदा हिंसात्मक आंदोलनाच्या मार्गाचाही अवलंब केला आहे.

**५)शिक्षक संघटना** -अलिकडच्या काळात तर शिक्षक संघटना आपल्या न्याय, हक्कासाठी शासनावर दबाव आण्यासाठी संघटित झालेल्या दिसून येतात. देशात राष्ट्रीय, प्रांतिय आणि स्थानीय पातळीवर शिक्षक वर्गाच्या संघटना स्थापन केलेल्या दिसतात.

**६)महिला संघटना** -भारतात महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्त्री मुक्ती आंदोलनासाठी महिला संघटनांची स्थापना झालेली दिसते. भारतात पूर्वीपासून पुरूषप्रधान संस्कृती होती. स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जात असे. आता मात्र स्त्रियांना पुरूषांबरोबर दर्जा देण्यात शासनाला यश आले आहे.

**७)उद्योगधंदे समूह** -हा भाडवलदार वर्ग म्हणजेच पिळवणूक, फसवणूक, नफेखोरी, भेसळ, काळापैसा, लाच लुचपत असे समिकरण येतील समाज माणसात झालेले आहे. अनेक बुद्धीवंतांच्या मते या देशात खरी सत्ता उद्योगपतींचीच आहे. बिरला-टाटा, दालमिया, मुंदडा बजाज हेच या देशाचे खरे राज्यकर्ते आहेत.

**८)गांधीवादी दबावगट** -गांधीजींचा वैचारिक व वारसा चालविणारे समूह हे भारताचे खास वैशिष्ट्ये म्हटले पाहिले. तेव्हा ते दबावगटाची भूमिका नाकारातात त्यांचा भार शासनबाह्य नैतिक प्रेरणावर असतो.

**९)शेतकरीक्षेत्र** -भारतासारख्या खेडी प्रधान व शेतीप्रधान देशात शेती विकासाला साहजिकच प्राधान्य दिले जाते. शेती विकासामुळे आजपर्यंत अनेक योजनांमधून येथे हरित क्रांती साकार झाली संघटित शेतकऱ्यांच्या मागण्यांमुळे त्यातल्या त्यात बऱ्याच गोष्टीशक्य झालेल्या दिसून येतात.

**दबावगटांचे वाढते महत्त्व** भारतीय राजकारणाचा अभ्यासात दबावगट आणि महाराष्ट्रातील दबावगटांचा आढावा घेतला तर असे म्हणता येईल की, दबावगट शासनाला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक कार्याची जाणीव आणि जबाबदारी समजावून देण्याची भूमिका पार पाडतात. उद्योगपती, व्यापारी, शेतकरी, कर्मचारी, कामगार, शिक्षक, विद्यार्थी, महिला असे विविध मार्गांचे हितसंबंध जोपासून समाज व्यवस्थेत समतोल साधण्याचे कार्य शासनाला पुरावे लागले त्या हितसंबंधी गटाकडे शासनाचे दुर्लक्ष होणे. त्या गटांकडून शासनावर दबाव आणला जाते. आणि शासनाला जागे केले जाते. राज्याच्या प्रशासनात सातत्य कार्यक्षमता आणि स्थौर्य निर्माण करण्यासाठी दबावगटाची निंतात आवश्यक असेल.

**निष्कर्ष** -१)भारतातील दबावगट राजकीय पक्षापासून स्वतंत्र नसल्यामुळे परिणाम असा होतो की, सदस्यांचे हितसंबंध अधिकृत करण्याऐवजी फक्त लोकमत आपापल्या पक्षास अनुकूल करण्याचाच प्रयत्न करतात.

२)भारतातील दबाबवगट सामूहिक कृतीपेक्षा अधिकाऱ्यांशी असलेल्या व्यक्तिगत संबंधावरच भिस्त ठेवतात.३)दबावगटांच्या हरताळ (संप) कायदेभंग इत्यादी मार्गाना उग्र, भयकर व हिसंक वळ लावण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होच महत्त्वाची कारणे आहे.

४)भारतातील काही दबावगट राजकीय प्रक्रिया म्हणून दबावगटात काम करताना दिसतात.

५)जनतेला कल्याणकारी योजनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी दबावगटाचा वापर अधिक उपयुक्त ठरतो.

६)विशिष्ट हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी समान हितसंबंध ठेवून लोक एकत्र येतात.

**संदर्भ सूची**

१.डॉ. वा.भा. पाटील, 'भारतीय राज्यघटना (भाग -२)', प्रशांत पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, जुन २०१२.

२.बी.बी. पाटील, 'भारतीय शासन आणि राजकारणष्, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती, जोन. २०१२.

३.डॉ. भास्कर लक्ष्मण मोडे, 'भारताचे शासन आणि राजकारण', पिंपळापूरे ॲण्ड पब्लिकेशन, नागपूर, पहिली आवृत्ती, २००३.

४.प्रा.बी.वाय. कुलकर्णी, 'भारतीय शासन व राजकारण', विद्याप्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट २००३.